नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा

(र.नं. एफ – १५६२ द्वारा संचालित)

# जिजामाता कला महाविद्यालय

कृषी महाविद्यालय परिसर, आर्णी रोड, दारव्हा, जि. यवतमाळ

दूरध्वनी – (०७२३८) २५५८६२

**NAAC Accredited ( 1st Cycle)**

**website : www.jkmvd.org**

**Email : jkmvd@rediffmail.com**



# माहिती पुस्तक

2022 - 2023

# अभिनंदन

## महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी



**कु. चंचल अ. राठोड**
बी.ए. भाग-३ मधून प्रथम



**कु. श्रध्दा ग. गावंडे**
बी.ए. भाग-२ मधून प्रथम



**कु. चैताली गजानन इंगळे**
बी.ए. भाग-१ मधून प्रथम



समाजशास्त्र विभागाव्दारे बाबासाहेब नाईक मुकबधिर विद्यालयास भेट




राज्यशास्त्र विभागाव्दारे नगर परिषद दारव्हा भेट




विद्यार्थी कल्याण विभागाव्दारे कोविड लसिकरण कॅम्प

# आमचे प्रेरणास्थान



## मा. आमदार श्री. माणिकरावजी ठाकरे

**संस्थापक अध्यक्ष, नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा**
**माजी गृह तथा उर्जा राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**
**माजी सदस्य तथा उपसभापती, विधान परिषद महाराष्ट्र राज्य**

"जे आहे त्यापेक्षा अधिक सुंदर
करण्याचा प्रयत्न करू"



डॉ. ए.पी. जाधव

प्राचार्य

# मनोगत

आमचे महाविद्यालय सन २००१-०२ पासून सुरू झाले आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या पदवी स्तरावरील किमान शिक्षणाची गरज लक्षात घेऊन आमच्या नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळाने महाविद्यालय सुरू केले. विद्यार्थी व पालक वर्गाचा प्रतिसाद, व्याख्यातावर्गाचे उत्तम सहकार्य, कर्मचारी वर्गाचे परिश्रम आणि संस्थेच्या वेळोवेळी आधार देण्याच्या भूमिकेमुळे आमचे महाविद्यालय उत्तरोत्तर प्रगती करीत आहे.

त्यामुळे मला पूर्ण विश्वास आहे की, अगदी अल्पावधीतच हे महाविद्यालय या विभागात स्वत:चा लौकीक प्रस्थापित करू शकेल. आणि प्राधिकृत संस्थांच्या निकषावर गुणवत्ता प्राप्त करू शकेल. आपणा सर्वांच्या सहकार्यानेच हे साध्य होईल.

डॉ. आश्रु पुंजाजी जाधव
प्राचार्य
जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा

**नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा**
(र.नं. एफ - १५६२ द्वारा संचालित)

# जिजामाता कला महाविद्यालय

**कृषी महाविद्यालय परिसर, आर्णी रोड, दारव्हा, जि. यवतमाळ**
**दूरध्वनी - (०७२३८) २५५८६२**
NAAC Accredited ( 1st Cycle)
website : www.jkmvd.org
mail id : jkmvd@rediffmail.com

# माहिती पुस्तक

## 2022 - 2023

**सत्र २०२२-२३ या सत्राच्या माहिती पुस्तीकेमधील माहितीमध्ये किंवा नियामिकेमध्ये आपातकालीन परिस्थीतीत केंद्र व राज्य शासन, संग गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती यांच्या निर्देशाप्रमाणे बदल करण्यात येईल.**

## VISION

Vision of the college is to enhance the qualities and skills in the students especially in rural and tribal areas. To equip the students with better knowledge for all round development. To make them capable to face the new challenges of new era confidently. To make them capable to touch the new horizons of knowledge and employment for their better future, well as to emerge responsible citizen for the service of community.

## MISSION

The Institution is committed to involve the down trodden classes of society, that live in remote mofussial areas is to the stream of National Education, with the lofty aim of moulding these young men and women into the strong personalities and responsible citizen of the nation for the nation.

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा (र.नं. एफ - १५६२) द्वारा संचालित

# जिजामाता कला महाविद्यालय

नवीन इमारत, आर्णी रोड, दारव्हा, जि. यवतमाळ

## महाविद्यालयाचे नियमित सत्र २०२२-२३

**शुक्रवार दि. ०१ जुलै २०२२ पासून सुरू होत आहे.**

**या सत्रात प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होणार याकरीता** www.jkmvd.org **या वेबसाईटवर जावून ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावे.**

- **बी.ए. भाग - १**
- **बी.ए. भाग - २**
- **बी.ए. भाग - ३**

अभ्यासक्रमाकरिता प्रवेश दिला जाईल.

शिक्षणाचे माध्यम मराठी राहील.

अभ्यासक्रमाकरिता खालील प्रमाणे विषय घेता येईल.

### ✪ बी.ए. भाग १

| | | | |
|---|---|---|---|
| आवश्यक विषय | : | १) मराठी | २) इंग्रजी |
| ऐच्छिक विषय | : | १) गृहअर्थशास्त्र | २) राज्यशास्त्र |
| | | ३) इतिहास | ४) समाजशास्त्र |
| | | ५) इंग्रजी वाङ्मय | ६) मराठी वाङ्मय |

**सूचना :-**

१) वरील ऐच्छिक विषयापैकी कोणतेही तीन विषय विद्यार्थ्यांनी विचारपूर्वक घ्यावेत.

२) प्रवेश अर्जावर एकदा घेतलेले विषय कोणत्याही स्थितीत बदलवून मिळणार नाही.

३) इंग्रजी वाङ्मय विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांनी विषय अध्ययनाची जबाबदारी स्वत: घ्यावी. या संदर्भात प्राचार्यांशी संपर्क साधावा.

४) एकदा प्रथम वर्षात स्वीकारलेले विषय अंतीम वर्षाच्या परीक्षेपर्यंत कायम राहतील.

### ✪ बी.ए. भाग २

प्रथम वर्षामध्ये स्वीकारलेले विषय. तसेच, 'पर्यावरणशास्त्र अभ्यास' हा विषय अनिवार्य राहील.

## ✪ बी.ए. भाग ३

प्रथम द्वितीय वर्षामध्ये स्वीकारलेले विषय.
प्रत्येक वर्गाचे सविस्तर व खुलासेवार वेळापत्रक सूचनाफलकावर लावले जाईल.
जागेच्या उपलब्धतेप्रमाणे नियोजन करून वेळापत्रकाची रचना केली जाईल.
त्यातील फेरबदल प्राचार्यांचे आदेशावर अवलंबून राहील.

## ✪ सर्टीफिकेट कोर्सेस

महाविद्यालयात दरवर्षी विविध विभागामार्फत सर्टीफिकेट कोर्सेस राबविले जातात.

१) इंग्रजी विभाग :– Short Term Course in Communication in English
Intake Capacity - 30

२) गृह अर्थशास्त्र :– Short Term Course in Embroidery
Intake Capacity - 30

३) समाजशास्त्र विभाग :– Certificate Course in Social Psychology
Intake Capacity - 25

## ✪ प्रवेश प्रक्रिया :

महाविद्यालयाच्या विहीत नमुन्यातील छापील अर्जावर उमेदवाराने स्वत:च्या हस्ताक्षरात आवश्यक ती सर्व माहिती भरून पालकांची सही घ्यावी, त्यासोबत....

१. मूळ गुणपत्रिका (चार सत्यप्रतीसह)
२. शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.) (चार सत्यप्रतीसह)
३. ई.बी.सी. सवलत धारक विद्यार्थ्यांचे दोन प्रतीतील ई.बी.सी. अर्ज.
४. नामांकनाचा अर्ज (वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांकरिता)
५. आवेदनपत्र व ओळखपत्राकरिता स्वत:चे नुकतेच काढलेले पासपोर्ट फोटो (प्रती दोन) ही कागदपत्रे जोडावी.
६. शिष्यवृत्ती अर्ज – स्टॅम्पपेपरवर उत्पन्नाच्या प्रतिज्ञेसह, विद्यार्थ्यांचे महाविद्यालय निर्देशित राष्ट्रीयकृत बँकेतील खाते. या संदर्भात महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवरील सूचना वेळोवेळी वाचाव्या.

## ✪ प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महत्वाच्या सूचना :

१. कोणत्याही आवश्यक मूळ कागदपत्राचा अभावी प्रवेश दिला जाणार नाही. प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची मूळ गुणपत्रिका विद्यापीठ तपासणीनंतर सुमारे १ वर्षाने परत मिळेल. तसेच शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.) मात्र कधीच परत मिळणार नाही. म्हणून, विद्यार्थ्यांनी या दोन कागदपत्रांच्या पुरेश्या सत्यप्रती (झेरॉक्स) स्वत:जवळ काढून ठेवाव्या.

२. महाराष्ट्र शिक्षण विभागीय मंडळ किंवा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ या व्यतिरिक्त अन्य मंडळ अथवा विद्यापीठाची तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी जर प्रवेश घेत असतील तर त्यांना 'मायग्रेशन सर्टिफिकेट' अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील.

३. कोणत्याही विद्यार्थ्यास प्रवेश देण्याचा तसेच प्रवेश नाकारण्याचा संपूर्ण अधिकार प्रवेश समितीला राहील व अंतीम निर्णय प्राचार्य घेतील.

४. विद्यापीठ नियमानुसार महाविद्यालयात घेतलेल्या प्रवेशाबद्दल विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील तांत्रिकदृष्ट्या व विद्यार्थ्यांच्या चुकीमुळे रद्द झालेल्या प्रवेशाला महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. विद्यार्थ्यांनी घेतलेला प्रवेश रद्द झाल्यास भरलेले शुल्क परत मिळणार नाही.

५. सतत गैरहजर वा अन्य कारणास्तव चालू सत्रात महाविद्यालयातील पटावरून नाव कमी केल्यास प्राचार्यांच्या संमतीने पुन्हा प्रवेश घेऊन नियमानुसार फी भरावी लागेल. त्यास फी सवलत मिळणार नाही.

६. महाविद्यालयातील सर्व प्रवेश गुणवत्तानिहाय तसेच आरक्षणाच्या नियमानुसार होतील.

७. पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी भाग १ ची परीक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका देणे अनिवार्य आहे.

८. या माहितीपत्रकातील सर्व माहिती प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर तसेच त्यांच्या पालकांवर बंधनकारक राहील.

९. अवयव दान करण्याकरीता आपण इच्छुक असल्यास तशा प्रकारची माहिती महाविद्यालयीन प्रशानास द्यावी.

## शुल्क रचना सन २०२२-२३

सदर शुल्क रचना मागील सत्राप्रमाणे आहे. विद्यापीठ आणि समाजकल्याण विभागाने मंजुरी दिल्यानुसार अंतिम होईल विद्यार्थ्यांना खालील शुल्क प्रवेश घेतेवेळी भरावे लागेल.

| क्र. | विवरण | बी.ए. भाग १ | बी.ए. भाग २ | बी.ए. भाग ३ |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यापीठ वार्षीक शुल्क | ७० | ७० | ७० |
| २. | विद्यापीठ नामांकन शुल्क | १०० | – | – |
| ३. | आपतकालीन निधी | १० | १० | १० |
| ४. | विद्यार्थी कल्याण निधी | १० | १० | १० |
| ५. | विद्यापीठ क्रीडा शुल्क | १३५ | १३५ | १३५ |
| ६. | कॉरपस फंड | ५ | ५ | ५ |
| ७. | अश्वमेघ क्रीडा व इंद्रधनुष्य स्पर्धा निधी | ३० | ३० | ३० |
| ८. | विद्यापीठ विद्यार्थी परिषद शुल्क | ५ | ५ | ५ |
| ९. | संत गाडगेबाबा अध्यासन केंद्र निधी | १ | १ | १ |
| १०. | विद्यार्थी सुरक्षा निधी | १० | १० | १० |
| ११. | इतर अभ्यासक्रम पुरक कार्यक्रम | ७० | ७० | ७० |
| १२. | वैद्यकीय तपासणी शुल्क | ४५ | ४५ | ४५ |
| १३. | महाविद्यालयीन परीक्षा शुल्क | १०० | १०० | १०० |
| १४. | महाविद्यालय वार्षिकांक शुल्क | ७० | ७० | ७० |
| १५. | महाविद्यालय ओळखपत्र शुल्क | ३० | ३० | ३० |
| १६. | ग्रंथालय शुल्क | १३५ | १३५ | १३५ |
| १७. | विद्यार्थी सहाय्यता निधी | २५ | २५ | २५ |
| १८. | इतर सुविधा शुल्क | ७० | ७० | ७० |
| १९. | शारिरीक क्षमता चाचणी | २५ | २५ | २५ |
| २०. | पर्यावरण अभ्यासक्रम शुल्क | – | १३५ | – |
| २१. | वाहनतळ | ५० | ५० | ५० |
| २२. | सुरक्षा शुल्क | ५० | ५० | ५० |
| | एकूण | १०४६ | १०८१ | ९४६ |
| २३. | गृहअर्थशास्त्र असल्यास प्रात्याक्षिक शुल्क | ४०५ | ४०५ | ४०५ |
| | एकूण | १४५१ | १४८६ | १३५१ |
| २४. | शिक्षण शुल्क (सवलतधारक विद्यार्थी वगळून) | ८०० | ८०० | ८०० |

- पर्यावरण अभ्यास शुल्क आणि प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क याबाबत विद्यापीठ व जिल्हा समाजकल्याण विभागाच्या निर्देशानुसार प्राचार्य कार्यवाही करतील. हे दोन्ही शुल्क परीक्षा शुल्कामध्ये समाविष्ट केले आहे.
- समाजकल्याण विभागामार्फत मंजुर न झालेले परंतु महाविद्यालय पूरवित असलेल्या सुविधांचे शुल्क भरणे आवश्यक आहे.
- काही शुल्क जसे प्रवजन शुल्क, विलंब नामांकन शुल्क, शिक्षण शुल्क, दुय्यम ओळखपत्र शुल्क, दुय्यम टी.सी., वाहनतळ शुल्क आवश्यकतेनुसार आकारले जाईल.
- शुल्क रचनेतील बदल विद्यापीठाच्या निर्देशावर अवलंबून राहील.

## प्रवेशासंदर्भात सामान्य सूचना

१. **महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर लगेच महाविद्यालय सोडले तरी विद्यार्थ्याला पूर्ण सत्राची फी द्यावी लागेल.**

२. महाराष्ट्र शिक्षण विभागीय मंडळ किंवा अमरावती विद्यापीठाव्यतिरिक्त प्रवेशित विद्यार्थ्यांना १२५.०० रू. निर्गम फी द्यावी लागेल.

३. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नियमान्वये प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

४. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी सूचना फलकावर लावली जाईल. प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश तथा अन्य शुल्क परत मिळू शकेल.

५. प्रवेश मिळालेल्या प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांची उपस्थिती किमान ८०% इतकी असणे अनिवार्य आहे. अन्यथा, त्यांना परीक्षा, सवलती व कार्यक्रम या बाबीपासून वंचित रहावे लागेल.

६. शिष्यवृत्ती अर्ज – स्टॅम्पपेपरवर उत्पन्नाच्या प्रतिज्ञेसह, विद्यार्थ्यांचे महाविद्यालय निर्देशित राष्ट्रीयकृत बँकेतील खाते या संदर्भीत महाविद्यायाच्या नोटीस बोर्डवरील सूचना वेळोवेळी वाचाव्या. नवीन शासनादेशानुसार ऑनलाईन संगणकीकृत अर्ज भरावे.

## महाविद्यालयीन परिप्रेक्ष् य

१) महाविद्यालयीन वातावरणाच्या कक्षेत विद्यार्थी घडवण्याच्या दृष्टीने सर्वांच्या सहकार्यातून महाविद्यालयातील प्रत्येक घटकांवर योग्य ती जबाबदारी दिलेली असते अशा नियोजनातूनच महाविद्यालय नावारूपास येत असते. आमच्या महाविद्यालयाने टाकलेला हा दृष्टीक्षेप...

२) संपूर्ण महाविद्यालय परिसर सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याच्या देखरेखीत आहे.

## ओळखपत्र

प्रवेश मिळाल्यानंतर आपले ओळखपत्र तयार करून घ्यावे व त्यावर प्राचार्यांची सही घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. वाचनालयातील पुस्तक, मासिके, विविध कार्यक्रमांना उपस्थिती, विद्यापीठाचे कार्यक्रम, विद्यापीठ परीक्षा याकरिता ओळखपत्र असणे आवश्यक आहे. नेहमी ओळखपत्र जवळ बाळगावे.

## ✪ महाविद्यालयाचे ग्रंथालय

महाविद्यालयाचे ग्रंथालय दिवसेंदिवस विकसीत होत असून विद्यार्थ्यांना नवीन नवीन अद्ययावत सुविधा पुरविण्यात येते. विद्यार्थ्यांकरिता वाचनकक्ष, भरपूर ग्रंथ संपदा, स्पर्धा परिक्षेकरिता आवश्यक पुस्तके व मासिके, विविध विषयाचे संदर्भ ग्रंथ, अभ्यासक्रमिक पुस्तके, वर्तमानपत्रे, रोजगार संधिचे वर्तमानपत्रे, विविध संदर्भ ग्रंथाचे सिडी व सिडी रॉम विद्यार्थ्यांकरीता ग्रंथालय उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच ग्रंथालयातर्फे ग्रंथप्रदर्शनी, निबंध स्पर्धा, स्पर्धा परीक्षा सराव घेतला जातो. तसेच आंतरग्रंथालयीन सुविधा आमच्या ग्रंथालयाकडून पुरविण्यात येते. तसेच ग्रंथालयाचे संपुर्ण संगणकीकरण करण्याचा, विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय माहिती सेवा पुरविण्यासाठी आवश्यक असणारी विविध **Consortia** ची सेवा पुरविण्याचे आमच्या भविष्यकालीन योजना आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला ग्रंथालयाच्या नियमाप्रमाणे ठराविक मुदतीकरिता ग्रंथ वापरता येईल, ठराविक मुदतीच्या आत ग्रंथ परत न केल्यास प्रति दिवस १.०० रू. प्रमाणे दंड भरावा लागेल. प्रत्येक विद्यार्थ्यांना फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात ग्रंथालयाची आपणाकडे असलेली ग्रंथ परत करावी. ग्रंथालया मार्फत पुरविण्यात आलेल्या विविध सुविधा स्थगित करण्याचा अधिकार ग्रंथपाल आणि प्राचार्यकडे राहील. ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असून ग्रंथालयीन सॉफ्टवेअरच्या माध्यमातून पुस्तकाची देवाण-घेवाण करण्यात येते. विद्यार्थ्यांना ऑनलाईन माहिती व विविध स्वयंरोजगार, स्पर्धा परिक्षेची माहिती, सामान्यज्ञान अशा विविध बाबींकरीता ग्रंथालयात नेटवर्क रिसोर्स सेंटरची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## ✪ सुचना (ऑनलाईन क्लासेस)

आपातकालीन परिस्थीती उद्‌भवल्यास विद्यापीठाच्या निर्देशानुसार महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन क्लासेससाठी किमान अँनरॉईड मोबाईल असावा. तसेच **Playstore** मधून **Zoom meeting app & Google meet app** डाऊनलोड करून ठेवावे.

## ✪ शारीरिक शिक्षण विभाग

**अ) खेळ व क्रीडा :** विद्यार्थ्यांमध्ये विविध क्रीडा प्रकारात रूची निर्माण करण्याच्या दृष्टीने महाविद्यालय आर्थिक उपलब्धतेनुसार भरपूर उत्तेजन देत असते. क्रीकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, अॅथलेटिक्स, खो-खो, टेनिस, बॅडमिन्टन, थाळीफेक, गोलाफेक, चेस, धनुर्विद्या वगैरे खेळाकरिता क्रीडांगण व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालय प्रयत्नरत आहे. विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेण्याकरीता विद्यार्थ्यांची चमू निवडली जाते.

**ब) शारीरिक क्षमता चाचणी** : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार शारीरिक क्षमता तासिकेला सर्वांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच, विद्यापीठाच्या निर्देशानुसार सत्राअखेर घेण्यात येणाऱ्या शारीरिक क्षमता चाचणी परीक्षेला सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. अन्यथा, रू. २५/- दंड भरावा लागेल.

**क) वैद्यकीयतपासणी**

अशा प्रकारच्या चाचणीद्वारे विद्यार्थ्यांच्या शारीरिक आरोग्यविषयक तक्रारींचे निवारण करण्यात येईल. विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयात सत्राअखेर वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित केल्या जाईल. सर्वांनी त्याला उपस्थित रहावे. अन्यथा रू. २५/– प्रमाणे दंड भरावा लागेल.

## ✪ राष्ट्रीय सेवा योजना

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने मंजूर केलेल्या मर्यादित विद्यार्थीसंख्येवर योजनेत प्रवेश दिला जाईल. दोन वर्षाचे २४० तास काम (प्रतिवर्ष १२० तास काम), एक विशेष शिबीर व नियमित कार्यक्रमांमध्ये किमान ७५% उपस्थिती या बाबी पूर्ण केल्यानंतर प्रोत्साहनपर गुण आणि प्रमाणपत्र देण्यात येईल. हे सर्व अधिकार कार्यक्रम अधिकारी तथा प्राचार्य यांचेकडे राहील.

## ✪ उपहारगृह सुविधा

महाविद्यालय परिसरामध्ये विद्यार्थ्यांकरीता उपहार गृहाची सुविधा उपलब्ध आहे.

## ✪ छात्रसंघ

विद्यापीठ निर्देशानुसार प्राचार्य छात्रसंघाचे दरवर्षी नव्याने गठण करीत असतात. छात्रसंघात गुणवत्तानिहाय निवड होते. तसेच, विविध विभागातील प्रावीण्यप्राप्त विद्यार्थी छात्रसंघासाठी पात्र असतात. प्राचार्यांच्या अधिकाराने त्यांची निवड होते.

## ✪ छात्रसंघोत्सव-युवा महोत्सव

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ दरवर्षी सामान्यत: सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात युवक महोत्सवाचे आयोजन करीत असते. स्थळ व निश्चित तारखा वेळेपूर्वी कळविल्या जातात. मात्र, त्यातील विविध घटकांमध्ये समावेश घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी सत्राच्या सुरूवातीलाच प्राचार्य व शारीरिक शिक्षण संचालकांना भेटून शुल्क भरून प्रवेश निश्चित करण्याची विनंती करावी. तसेच महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याकरिता प्राचार्यांच्या संमतीने छात्रसंघोत्सव आयोजित केला जातो.

## ✪ प्रोत्साहनपर गुण

संत गाडगेबाबाबा अमरावती विद्यापीठाने वार्षिक परीक्षेत पुढील प्रोत्साहनपर गुण देण्याची योजना केली आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा.

(अ)१. राष्ट्रीय सेवा योजना सहभाग ०५ गुण
(अटी – १२० तास काम प्रतिवर्ष, शिस्तप्रियता)

२. राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर सहभाग ०१ गुण
(अटी – शिबीरात पूर्णवेळ उपस्थिती)

३. विद्यापीठस्तरीय रा.से.यो. शिबीर सहभाग ०१ गुण
(अटी – या शिबीरात उपस्थितीचे प्रमाणपत्र मिळाल्यास)

आ) १. आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा — ०३ गुण
(विद्यापीठस्तरावरील सहभाग)

२. आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा सहभाग — ०५ गुण
(विद्यापीठद्वारा)

(इ) १. वादविवाद, नाटक, संगीत या स्पर्धेमध्ये — ०३ गुण
(विद्यापीठस्तरीय सहभाग)

२. वादविवाद, नाटक, संगीत या स्पर्धेमध्ये — ०४ गुण
(विद्यापीठाद्वारे सहभाग)

(ई) शासकीय मदतीसाठी सर्वेक्षणातून माहिती जमविणे — ०५ गुण

(फ) रक्तदान–मान्यताप्राप्त शिबीरांमध्ये प्रत्येक वेळी ०२ गुण जास्तीत जास्त — ०५ गुण
(खाजगी संस्था अथवा खाजगी व्यक्तीस रक्तदान केले असल्यास ते वगळून)

(ग) प्रौढ साक्षरता क्षेत्रात योगदान — ०५ गुण

(ह) होमगार्ड मध्ये सहभाग व त्याच्या शिबीरातील सहभागाचे अधिक — ०५ गुण

टीप : (१) वरीलपैकी मिळणाऱ्या एकूण गुणांची बेरीज प्रतिवर्ष जास्तीत जास्त १० गुणांपेक्षा जास्त ग्राह्य धरता येत नाही. (२) हे गुण फक्त २ वर्षेपर्यंत भेटू शकतात. त्यामुळे परीक्षेमध्ये दोन वर्षामिळून एकूण बेरीज २० पेक्षा जास्त ग्राह्य धरण्यात येत नाही.

## ✪ अभ्यासमंडळ/परिसंवाद

महाविद्यालयात प्रत्येक विषयाचे स्वतंत्र अभ्यास मंडळ स्थापन करण्यात येते. प्राचार्य, विभागप्रमुख आणि विद्यार्थीप्रतिनिधी यांचे चर्चेतून त्याचे स्वरूप ठरविले जाते. या अभ्यासमंडळामार्फत विविध अभ्यासक्रमिक कार्यक्रम तसेच परिसंवाद आयोजित करण्यात येते.

## ✪ महाविद्यालयीन परीक्षा

महाविद्यालयामार्फत सामान्यत: चार घटक चाचण्या व दोन सत्र परीक्षा घेतल्या जातात. महाविद्यालयाच्या परीक्षा विभागाने सूचविलेल्या वेळापत्रकानुसार या परीक्षा घेतल्या जातात. गैरहजर विद्यार्थ्यांना निर्धारीत दंड भरावा लागेल.

## ✪ महाविद्यालयीन मूल्यशिक्षण

सभोवतालचे सामाजिक पर्यावरण जपण्यासाठी युवक तयार करण्याची जबाबदारी लक्षात घेता विद्यापीठाच्या निर्देशाद्वारे अभ्यासक्रमात मूल्यशिक्षणाचा समावेश केला आहे.

## ✪ पर्यावरण अभ्यासमंडळ

गेल्या सत्रापासून बी.ए. भाग द्वितीय करिता अनिवार्य असलेला पर्यावरणशास्त्र अभ्यास विषयाच्या अनुषंगाने महाविद्यालयात पर्यावरण अभ्यास मंडळ स्थापन करण्यात येत आहे. तसेच, विद्यापीठामार्फत घेतल्या गेलेल्या परीक्षेतील निकाल पदवी प्राप्त करण्याकरिता महत्वाचा आहे.

## ✪ सहल

अभ्यासक्रमाव्यतिरीक्त असणाऱ्या उपक्रमामध्ये महाविद्यालयामध्ये दरवर्षी प्राचार्यांच्या संमतीने एक कमी अंतरावरील सहल व एक दूरच्या अंतरावरील सहलीचे आयोजन केल्या जाते. त्यांचे स्थळ, तारखा आणि नियोजन संपूर्णपणे प्राचार्यांच्या अधिकारात येणाऱ्या बाबी आहेत. प्राचार्य चर्चा करून त्याची रूपरेखा ठरवितात.

## ✪ वार्षिकांक

विद्यार्थ्यांमधील लेखनशैलीला उत्तेजन मिळावे म्हणून महाविद्यालय वार्षिकांकाची निर्मिती करीत असते. 'जिजाऊची लेक' हा वार्षिकांक महाविद्यालयातर्फे दरवर्षी प्रकाशित केल्या जात आहे.

## ✪ पालक सभा

प्रवेशित विद्यार्थ्यांच्या वडील अथवा पालकांना महाविद्यालयामध्ये बोलावून त्यांना महाविद्यालयाची प्रगती, पाल्याची प्रगती याबाबत आढावा दिल्या जाईल. तसेच त्यांचे महाविद्यालया संदर्भात मत जाणून घेतल्या जाईल. ही पालक सभा वर्षातून दोनदा घेतल्या जाईल.

## ✪ पारितोषिक-पुरस्‍ कार-शिष्यवृत्त ि.

महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण स्पर्धात्मक आणि उच्च गुणात्मक होण्याच्या दृष्टीने प्रत्येक विषयासाठी पुरस्कार योजना राबविण्याच्या हेतूने महाविद्यालय व व्यवस्थापन मंडळ प्रयत्नरत आहे. त्याची यादी सोबत जोडलेली आहे.

## ✪ बेशिस्‍ तपणासंदर्भात सूचना

विद्यापीठ आणि शासन निर्णयानुसार रॅगींग सारखे प्रकार, व्यसनासारखे प्रकार, जातीय संघटना तयार करण्यासारखे प्रकार, गुन्हेगारी प्रवृत्तीचे दबावगट तयार करण्यासारखे प्रकार, मुलीसंदर्भातील आक्षेपार्ह वर्तन वरील बाबींना महाविद्यालय परिसरात स्थान नाही. या गुन्ह्यामध्ये सापडणाऱ्या विद्यार्थ्यांवर कठोर कारवाई प्राचार्यांचे अधिकारात केली जाईल.

## ✪ विद्यार्थ्यांकरिता आचार सूचना

१. शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सवलती, शिष्यवृत्ती, मानधन या संदर्भातील संपूर्ण माहिती लिपीकाकडून सत्र सुरूवातीलाच घ्यावी.
२. ग्रंथालयात येताना ओळखपत्र सोबत आणावे.
३. महाविद्यालयामार्फत आयोजित प्रत्येक कार्यक्रमास नियमित हजर रहावे. हजर न राहील्यास नियमानुसार आर्थिक दंड द्यावा लागेल.

४. महाविद्यालयातील आपली उपस्थिती ८०% पेक्षा कमी नसावी.

५. प्राचार्यांच्या सूचनांचे व आदेशांचे तंतोतंत पालन करावे.

६. प्राध्यापक व कर्मचारी वर्गाशी सभ्यतापूर्वक वागावे.

७. प्राचार्य, प्राध्यापक, सन्माननीय व्यक्ती वर्गात असल्यास त्यांना उत्थापन द्यावेत त्यांच्या अनुमतीनेच बैठक घ्यावी.

८. वर्ग सुरू असताना वर्गात किंवा व्हरांड्यात गोंधळ घालू नये.

९. खिडकीचे तावदाने, फर्निचर, ग्रंथालयातील ग्रंथ ही महाविद्यालयाची संपत्ती आहे. तिची नासधूस, मोडतोड करू नये. अन्यथा, दंड आकारल्या जाील.

१०. परिसरामध्ये स्वच्छता नांदावी, असे प्रयत्न नेहमी करावे. कचरा, घाण, भिंतीवर लिहीणे, सूचना फलकावरील सूचना फाडणे वगैरे वर्तन करू नये.

११. आपली वेशभुषा सुसंस्कृत, नीटनेटकी व सभ्यतादर्शक असावी.

१२. सूचना फलकावरील सूचना नेहमी न्याहाळत राहाव्या.

१३. वर्गात विद्यार्थ्यांजवळ अभ्यासक्रमातील पाठ्यपुस्तके, वह्या व तत्संबंधी साहित्य असणे श्रेयस्कर आहे.

१४. बाहेरील अनाधिकृत व्यक्तींना महाविद्यालय परिसरात आणू नये. विद्यार्थ्यांच्या परिसाबाहेरील असभ्य वर्तनाचा महाविद्यालय निषेध करते आणि शक्य झाल्यास त्यांची गंभीर दखल सुद्धा घेऊ शकते.

१५. महाविद्यालयीन कार्यक्रम प्रभारी प्राध्यापकांच्या देखरेखीखाली साधेपणाने घेतले जाईल.

१६. विद्यार्थ्यांच्या पत्त्यात बदल झाल्यास तसे कार्यालयास कळवावे.

१७. सत्यप्रती साक्षांकीत करून घेताना मूळ कागदपत्रे सोबत आणावी.

१८. महाविद्यालयीन सुट्यांसंदर्भात लिपीक आणि ज्येष्ठ प्राध्यापक यांचेकडे शहनिशा करावी.

१९. महाविद्यालयीन व्यवस्थेशी संदर्भात कोणतीही बाब विद्यार्थ्यांकडून प्रसिद्धीला जाता कामा नये.

२०. महाविद्यालयात शुल्क भरण्याच्या संदर्भातील पावत्या जपून ठेवाव्या.

२१. महाविद्यालय सोडण्याचा दाखला मिळण्याकरीता तीन दिवस अगोदर अर्ज करावा.

२२. आपल्या अडीअडचणी, समस्या प्राध्यापकांना भेटून सांगा. महाविद्यालय हे आपले शैक्षणिक कुटूंब आहे, हे लक्षात घ्या.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे पत्रानुसार शैक्षणिक नियमिका सत्र २०२२-२३

## शैक्षणिक कामकाज व सुट्या या संदर्भातील माहिती

वार्षिक पद्धतीने आणि सत्र पद्धतीने राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांकरीता शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्रथम सत्र, हिवाळी दीर्घ सुटी, द्वितीय सत्र आणि उन्हाळी दीर्घसुटी व त्यांचे अवसान खाली दर्शविल्याप्रमाणे राहील. **(फक्त शिक्षक व विद्यार्थी वर्गाकरिता)**

| अ. क्र. | कृती/कार्यक्रम | प्रारंभ | समाप्ती | एकूण दिवस |
|---|---|---|---|---|
| १. | **शैक्षणिक सत्र (प्रथम सत्र)** | शुक्रवार दि.०१ जुलै २०२२ | बुधवार दि.३० नोव्हेंबर २०२२ | ११० |
| २. | **प्रवेश प्रक्रीया** | शुक्रवार दि.०१ जुलै २०२२ | शनिवार दि.१६ जुलै २०२२ | १४ |
| ३. | **अभिक्रिया प्रक्रिया** (प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता) | सोमवार दि.१८ जुलै २०२२ | शनिवार दि.२३ जुलै २०२२ | ०६ |
| ४. | **शैक्षणिक दिवस (विषम सत्र)** | सोमवार दि.२५ जुलै २०२२ | शनिवार दि.२२ ऑक्टोंबर२०२२ | ७१ |
| | | बुधवार दि.०९ नोव्हेंबर २०२२ | बुधवार दि.३० नोव्हबर २०२२ | १९ |
| ५. | **प्रथम सत्र अवकाश** | सोमवार दि.२४ ऑक्टोंबर २०२२ | मंगळवार दि.०८ नोव्हेंबर २०२२ | १६ |
| ६. | **विषम सत्रांची विद्यापीठीय परीक्षा/अशैक्षणिक दिवस** | गुरूवार दि.०१ डिसेंबर २०२२ | शनिवार दि.२१ जानेवारी २०२३ | ४५ |
| ७. | **शैक्षणिक सत्र (द्वितीय सत्र)** | सोमवार दि.२३ जानेवारी २०२३ | शनिवार दि.२७ मे २०२३ | ९८ |
| ८. | **अशैक्षणिक सत्र** (NSS,Gathering) | सोमवार दि.२३ जानेवारी २०२३ | मंगळवार दि.३१ जानेवारी २०२३ | ०७ |
| ९. | **शैक्षणिक दिवस (सम सत्र)** | बुधवार दि.०१ फेब्रुवारी २०२३ | शनिवार दि.२७ मे २०२३ | ९१ |
| १०. | **सम सत्रांची विद्यापीठीय परीक्षा** | सोमवार दि.२९ मे २०२३ | शनिवार दि.०१ जुलै २०२३ | २९ |
| ११. | **द्वितीय सत्र अवकाश** | सोमवार दि.२९ मे २०२३ | शनिवार दि.०१ जुलै २०२३ | ३४ |
| **पुढील शैक्षणिक सत्राचा २०२३-२०२४ चा प्रारंभ -** सोमवार दि.०३ जुलै २०२३ | | | | |

अ) विद्यापीठाने खालील कालावधीत नियमित परीक्षांचे आयोजन करावे.

| अ.क्र. | कृती/कार्यक्रम | प्रारंभ | समाप्ती | एकूण दिवस |
|---|---|---|---|---|
| १. | हिवाळी परीक्षा | गुरूवार<br>दि.०१ डिसेंबर २०२२ | शनिवार<br>दि. ३१ जानेवारी २०२३ | ४५ |
| २. | उन्हाळी परीक्षा | सोमवार<br>दि.२९ मे २०२३ | शनिवार<br>दि.०१ जुलै २०२३ | २९ |

विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील शैक्षणिक विभागाला
जाहीर झालेल्या सुट्या (फक्त शिक्षक व विद्यार्थी वर्गाकरिता)

| सण/सुट्या | दिवस व दिनांक |
|---|---|
| मोहरम | मंगळवार दि.०९ ऑगष्ट २०२२ |
| रक्षाबंधन | गुरूवार दि. ११ ऑगष्ट २०२२ |
| स्वातंत्र्य दिन | सोमवार दि. १५ ऑगष्ट २०२२ |
| पारशी नूतनवर्ष (शहेनशाही) | मंगळवार दि. १६ ऑगष्ट २०२२ |
| श्रीगणेश चतुर्थी | बुधवार दि. ३१ ऑगष्ट २०२२ |
| अनंत चतुर्दशी | शुक्रवार दि. ९ सप्टेंबर २०२२ |
| दसरा | बुधवार दि ५ ऑक्टोबर २०२२ |
| प्रजासत्ताक दिन | गुरूवार दि.२६ जानेवारी २०२२ |
| महाशिवरात्री | शनिवार दि.१८ फेब्रुवारी २०२३ |
| होळी (दुसरा दिवस) | मंगळवार दि. ७ मार्च २०२३ |
| गुढीपाडवा | बुधवार दि. २२ मार्च २०२३ |
| श्रीराम नवमी | गुरूवार दि. ३० मार्च २०२३ |
| महावीर जयंती | मंगळवार दि.०४ एप्रिल २०२३ |
| गुड फ्रायडे | शुक्रवार दि. ०७ एप्रिल २०२३ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | शुक्रवार दि.१४ एप्रिल २०२३ |
| रमझान ईद(ईद-उल-फितर) | शनिवार दि. २२ एप्रिल २०२३ |
| महाराष्ट्र दिन | सोमवार दि. ०१ मे २०२३ |
| बुध्द पोर्णिमा | शुक्रवार दि. ०५ मे २०२३ |

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाच्या सन २०२२ वर्षातील सार्वजनिक सुट्या (फक्त शिक्षकेत्तर वर्गाकरिता)

| अ.क्र. | सुटीचा दिवस | दिनांक | दिवस |
|---|---|---|---|
| १. | प्रजासत्ताक दिन | दि. २६ जानेवारी २०२२ | बुधवार |
| २. | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | दि. १९ फेब्रुवारी २०२२ | शनिवार |
| ३. | महाशिवरात्री | दि. ०१ मार्च २०२२ | मंगळवार |
| ४. | होळी (दुसरा दिवस) | दि. १८ मार्च २०२२ | शुक्रवार |
| ५. | गुढी पाडवा | दि. ०२ एप्रिल २०२२ | शनिवार |
| ६. | महावीर जयंती | दि. १४ एप्रिल २०२२ | गुरूवार |
| ७. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | दि. १४ एप्रिल २०२२ | गुरूवार |
| ८. | गुडफ्रायडे | दि. १५ एप्रिल २०२२ | शुक्रवार |
| ९. | रमजान ईद (ईद उल फितर)(शवल-१) | दि. ०३ मे २०२२ | मंगळवार |
| १०. | बुद्ध पौर्णिमा | दि. १६ मे २०२२ | सोमवार |
| ११. | मोहरम | दि. ०९ ऑगष्ट २०२२ | मंगळवार |
| १२. | स्वातंत्र्य दिन | दि. १५ ऑगस्ट २०२२ | सोमवार |
| १३ | पारशी नववर्षदिन (शहेनशाही) | दि. १६ ऑगस्ट २०२२ | मंगळवार |
| १४. | गणेश चतुर्थी | दि. ३१ ऑगस्ट २०२२ | बुधवार |
| १५. | दसरा | दि. ०५ ऑक्टोबर २०२२ | बुधवार |
| १६. | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपुजन) | दि. २४ ऑक्टोबर २०२२ | सोमवार |
| १७. | दिवाळी (बलिप्रतिपदा)/भाऊबीज | दि. २६ ऑक्टोबर २०२२ | बुधवार |
| १८. | गुरूनानक जयंती | दि. ०८ नोव्हेंबर २०२२ | मंगळवार |

**टिप : खालील सुट्या चौथ्या शनिवार व रविवार येत असल्यामुळे त्या दिवशी सुट्या जाहिर करण्यात आलेल्या नाही.**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | राम नवमी | दि. १० एप्रिल २०२२ | रविवार |
| ०२. | महाराष्ट्र दिन | दि. ०१ मे २०२२ | रविवार |
| ०३. | बकरी ईद (ईद-उल-झुला) | दि. १० जुलै २०२२ | रविवार |
| ०४. | महात्मा गांधी जयंती | दि. ०२ ऑक्टोबर २०२२ | रविवार |
| ०५. | ईद-ए-मिलाद | दि. ०९ ऑक्टोबर २०२२ | रविवार |
| ०६. | ख्रिसमस | दि. २५ डिसेंबर २०२२ | रविवार |

स्थानिक सुट्या स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येणार आहे.

# जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा

## प्राचार्य



**डॉ. ए.पी. जाधव**
एम.ए. (समाजशास्त्र),पीएच.डी.
प्राचार्य

## शिक्षक वृंद



**डॉ.आर.एस. खंडारे**
एम.ए. (मराठी), पीएच.डी.
सहा. प्राध्यापक



**डॉ. रामधन उ. हिरे**
एम.ए. (इतिहास), नेट, पीएच.डी.
सहयोगी प्राध्यापक



**डॉ. जयवंत पी. जुकरे**
एम.ए. (राज्यशास्त्र) सेट
पीएच.डी. सहयोगी प्राध्यापक



**डॉ. पुरूषोत्तम रा. बांडे**
एम.ए. (समाजशास्त्र) नेट,
एम.फिल., पीएच.डी.
सहा.प्राध्यापक



**डॉ. कु.प्रिती दे.ठाकरे**
एम.ए. (इंग्रजी), एम.फिल.
पीएच.डी. सहा. प्राध्यापक



**डॉ.राजेश श्री.गेडाम**
एम.एल.आय.एस्सी.,
एम.फिल., पीएच.डी.
ग्रंथपाल



**प्रा.कु.रूपाली सु.कणसे**
एम.ए. (गृहअर्थशास्त्र) सेट
एम.ए. (इतिहास), बी.एड्.
सहा. प्राध्यापक

## महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग

❖ ए.एम. राऊत ❖ नितेश कदम ❖ सचिन माटोडे

❖ सतिश सरतापे ❖ विनोद कंटाळे

❖ माणिक टिचुकले ❖ सोमराज लोहकरे

## संदेश

खरे बोला, धर्माला अनुसरून वागा, अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नका.

माता, पिता, गुरू आणि राष्ट्र ईश्वरासमान माना. शुभ आणि मंगल कार्याचाच अंगीकार करा. थोरांच्या जीवनाचा आदर्श समोर ठेवा.

## रॅगींग निषेध

अमरावती विद्यापीठाच्या दि. १५ डिसेंबर २००३ च्या पत्रानुसार शासनाने कळविल्याप्रमाणे रॅगींग विरोधी महाराष्ट्र प्रोव्हीबीशन ऑफ रॅगींग ॲक्ट, १९९९ ॲक्ट नं. ३३ ऑफ ९९) अंमलात आलेला आहे. या कायद्याने जबर शिक्षा तसेच महाविद्यालयातून काढून टाकण्याची कारवाई केली जाते. विद्यार्थ्यांना आवाहन आहे की, त्यांनी रॅगींगसारखे अनुचित प्रकार करण्याला प्रोत्साहन मिळेल, असे वर्तन करू नये.

## विशेष आवाहन

महाविद्यालय हे आपले शैक्षणिक कुटूंब आहे. त्यामुळे तेथील प्रवेशित विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या परिसर तथा परिसराबाहेरील असभ्य व असंस्कृत वर्तनाचा महाविद्यालय निषेध करते. शक्य झाल्यास त्याची गंभीर दखल सुद्धा घेण्यात येते.

## शासनाची ई-स्कॉलरशिप योजना

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या शासन निर्णय क्र. ईबीसी/-२००९/प्र.क्र. १२२/मावक-३ दिनांक ११ जानेवारी २०१० च्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांकरिता राष्ट्रीयकृत बँक खात्यामध्ये प्रत्यक्ष शिष्यवृत्ती रक्कम जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या निर्देशाप्रमाणे स्थानिक राष्ट्रीयकृत बँकेत आपली खाती उघडणे अनिवार्य आहे. शासनाच्या अल्पसंख्याक शिष्यवृत्ती आणि अपंग शिष्यवृत्तीचा लाभ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जरूर घ्यावा तसेच ऑनलाईन संगणकीकृत अर्ज भरावे.

# ऑनलाईन प्रवेश प्रकिया




- Visit to College Website
- Click on New Registration Link
- Enter your Email Id & Mobile Number
- Generate Username & Password (You will received on Mobile no.)
- Login with Generated Username & Password
- Fill All Fields of Registration Form
- Payment Condition Pay Online/Offine
- Take Printout of Registration Form
- Registration form submit to Admission Committee along with Original Documents




## ONLINE REGISTRATION PROCESS FOR EXITING STUDENTS SY / TY

- Visit to College Website
- Click on Sy/Ty Registration Link
- Enter your Registered Mobile Number
- Get User Id & Password
- Enter User Id & Password
- Payment Condition Online/Offline
- Fill the Form
- Take Printout of Registration Form
- Registration Form submit to Admission Counter

## ONLINE PAYMENT OPTION

- Visit to College Website
- Click on Online Payment Link or Visit on www.feepayr.com
- Enter your Registered Mobile Number
- Generate OTP & Enter OTP
- Pay Now Fees
  - Credit Card
  - Debit Card
  - Online Banking etc....
- Receipt Generation



# ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेकरीता खालील सुचनांचे अवलंबन करा.

शैक्षणिक सत्र २०२२-२३ करीता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अवलंबविली जाणार आहे. त्याकरीता सर्व वर्गाचे प्रवेश हे ऑनलाईन पद्धतीनेच होणार असून त्याकरीता खालील प्रवेश प्रक्रीया पद्धतीचा अवलंब करावा.

(बी.ए. भाग १, भाग २, भाग ३ करीता)

## Online Registration Process

- Visit College Website www.jkmvd.org.co.in
- ↓ Click on New Registration link
- ↓ Enter Email ID & Mobile No.
- ↓ Generate Username & Password (You will received on mobile no)
- ↓ Login with Generated Username & Password
- ↓ Fill All fields of Registration Form
- ↓ Take Printout of Registration Form
- ↓ Registration Form submit to Admission Committee along Original Document

## Online Registration Process for Exiting Student B.A. 2nd & 3rd

- Visit to College Website
- ↓ Click on B.A. Part II & B.A. Part III Registration
- ↓ Get User ID & Password
- ↓ Take Printout of Registration Form
- ↓ Registration Form Submit to Admission Counter

**टिप : वरील अर्ज भरल्यानंतर प्रवेश शुल्क महाविद्यालयात काऊंटरवर जमा करावी.**

# Jijamata Kala Mahavidyalaya, Darwha
## College Committees 2022 - 2023

| Sr.No | Name of the Criterion | Name of the Teacher |
|---|---|---|
| 1 | **Criterion - 1** Curricular Aspects | Ms. R.S. Kanse |
| 2 | **Criterion - 2** Teaching-learning and Evaluation | Dr. J.P. Jukare |
| 3 | **Criterion - 3** Research, Innovations and Extention | Dr. R.S. Khandare |
| 4 | **Criterion - 4** Infrastructure and Learning Resources | Dr. R.S. Gedam |
| 5 | **Criterion - 5** Student Support and Progression | Dr. P. R. Bande |
| 6 | **Criterion - 6** Governance, Leadership & Management | Dr. P.D. Thakare |
| 7 | **Criterion - 7** Institutional Values and Best Practices | Dr. Hire |

## College Development Committee
### Session 2022-23

| Sr. No. | Name | Designation | Designation of CDC |
|---|---|---|---|
| 1. | Hon. Manikarao Thakare | Founder President of NSPM | Chairperson |
| 2. | Mrs. Madhuritai Pole | Secretary of NSPM | Member |
| 3. | Dr. Ramdhan Hire | Faculty Member | Member |
| 4. | Dr. Purushottam Bande | Teacher Representative | Member |
| 5. | Dr. Rajesh Gedam | Teacher Representative | Member |
| 6. | Ms. Rupali Kanse | Teacher Representative | Member |
| 7. | Mr. Nitesh Kadam | Non-Teacher Representative | Member |
| 8. | Shri. Niranjan Chaudhari | Small Industrialist Representative | Member |
| 9. | Prin. Jayant Kale | Education Department Representative | Member |
| 10. | Prin. Prabhakar Bobade | Research Department | Member |
| 11. | Mr. Rahulbhau Thakare | Local Society Member | Member |
| 12. | Dr. Pritee D. Thakare | IQAC Co-ordinator | Member |
| 13. | Ku. Janvi Thorwe | Student Representative | Member |
| 14. | Ku. Sakshi Deshkari | Student Representative | Member |
| 15. | Dr. A.P. Jadhao | Principal | Secretary |

# विध्यार्थी दायित्व योजना

गरीब, होतकरू व अभ्यासू विद्यार्थ्यांकरीता आर्थिक सहाय्यता योजना
सदर योजना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकरीता सत्र २०२०-२१ पासुन महाविद्यालयात सुरू करण्यात आलेली आहे.

१. मा. प्राचार्य डॉ. आश्रु पुंजाजी जाधव यांच्या तर्फे ०२ विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्यता

२. मराठी विभाग प्रा.डॉ.आर.एस. खंडारे यांचे तर्फे ०२ विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्यता

३. इतिहास विभाग प्रा.डॉ. रामधन हिरे यांचे तर्फे ०२ विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्यता

४. राज्यशास्त्र विभाग प्रा.डॉ. जयवंत जुकरे यांचे तर्फे ०२ विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्यता

५ समाजशास्त्र विभाग प्रा.डॉ. पुरूषोत्तम बांडे यांचे तर्फे ०२ विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्यता

६. गृहअर्थशास्त्र विभाग प्रा. कु. रूपाली कणसे यांचे तर्फे ०२ विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्यता

७. ग्रंथालय विभाग प्रा.डॉ. राजेश गेडाम यांचेतर्फे ०२ विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्यता

टिप : आर्थिक सहाय्यता राशी ही एका विद्यार्थ्याला रूपये ५००/- पर्यंत प्रदान करण्यात येईल

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

## ।। विद्यापीठ गीत ।।



**विद्या चिंतन । विद्या मंथन ।**
**विद्या सर्जन । विद्या जीवन ।।**

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पुर्ण झाले ।।
कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले
पर्णकुटीतील प्रतिमेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसूत्राचे अक्षर-अक्षर, वेद नवा बोले ।। १ जनमन...

किती रंजले, किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मयोग निष्काम आचरुन, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओल्याव्याने, मानस मोहरले ।। २ जनमन...

धर्मजातीच्या पलिकडेही माणूस केवळ माणूस असतो
भेदभ्रमांचे बंध तोडूनी मानवतेचे पूजन करतो
पिढ्यापिढ्यांचे जीवन दर्शन विश्वात्मक झाले ।। ३
जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले ।।

**प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ**




ग्रंथ दिंडी –२०२२ दत्तकग्राम भुलाई सहभागी विद्यार्थीनी व प्रा. राजेश गेडाम




समाजशास्त्र विभागाव्दारा वृध्दाश्रमास जिवनाश्यक वस्तुची देणगी



पर्यावरण अभ्यास दौरा २०२२




**National Nutration Month Celebration organized by Home Economics Department**




रा.से.यो. विभागाव्दारा आयोजित रक्तदान शिबिरास मा. अशोकरावजी ठाकरे (व्यवस्थापक न.शि.प्र.मं. दारव्हा) यांची भेट व इतर प्राध्यापक वृंद



गांडुळ खत प्रकल्पामध्ये श्रमदान करतांना विद्यार्थी



डॉ. पी.आर.बांडे यांचे व्दारा लिखीत ग्रंथाचे प्रकाशन करतांना मा. अशोकरावजी ठाकरे, प्राचार्य व प्रमुख पाहुणे



डॉ. राजेश गेडाम यांच्या व्दारा संपादित केलेल्या ग्रंथाचे प्रकाशन करतांना मा. अशोकरावजी ठाकरे, प्राचार्य व प्रमुख पाहुणे



## वार्षिक युवा महोत्सव २०२२




## Stall Earn & Learn Activity by Home Economics Department




## Women Cell Meeting




## Inqugration Ceremony Equal Opportunity Centre 2022




महाविद्यालयाची अद्ययावत वास्तू


प्रकाशक

## डॉ. ए.पी.जाधव

प्राचार्य, जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा

email : jkmvd@rediffmail.com

फोन नं. : ०७२३८-२५५८६२, ९८५०८५७५०३

website : www.jkmvd.org

समिती

प्रा.कु.रूपाली एस. कणसे

प्रा.डॉ. राजेश श्री. गेडाम




वृक्ष संवर्धनाची शपथ घेतांना विद्यार्थी व प्राध्यापक वृंद